# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक रानिआ-१०९७/प्र.क्र. २८/९७/पंरा.,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक १६ जानेवारी १९९७.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,

**विषय** :–जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका-१९९७.
मतदार यादी तयार करणे.

महोदय,

विधानसभा मतदार यादी विभागून जिल्हा परिषदेचे मतदार गटनिहाय व पंचायत समितीचे मतदार गणनिहाय मतदार यादी तयार करणे अत्यंत महत्वाचे असून काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. त्या कामासाठी जबाबदार व अनुभवी अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करणे आवश्यक राहील. अशा तऱ्हेने मतदार यादी बनविताना जे अधिकारी/कर्मचारी यात चुका ठेवतील अथवा हेतूपुरस्सर हेराफेरी करतील त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही अत्यंत कठोरपणे केली जाईल, याबाबत संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना जाणीव करून द्यावी.

२. विधानसभा मतदार यादीवरून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणूकीसाठी यात्रिकपणे (MECHANICALLY) मतदार गट व मतदार गणामध्ये विभागून छापून घेताना काही त्रुटी निर्माण झाल्यास त्या दुरुस्त करण्यासंबंधी कायद्यामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. परंतु, विधानसभा मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट असल्यास मतदार यादी तयार करणाऱ्या व ती अधिप्रमाणित करणारया अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या चुकामुळे संबंधित मतदार गटात, मतदार गणात मतदारांस मतदान करण्याविषयी वंचित करणे योग्य होणार नसल्याकारणाने भारतीय संविधानाच्या कलम २४३-के व मुंबई जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे महाराष्ट्र अधिनियम १९६२ चे ५) कलम ९अ खालील व इतर प्राप्त अधिकारांचा विचार करून राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र असे आदेश देत आहे की, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणूकीसाठी वर नमूद केलेल्या कायद्यातील तरतूदीप्रमाणे राज्य निवडणूक आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करून छापून घेतल्यावर विधानसभेच्या मतदार यादीप्रमाणे एखाद्या मतदाराचे नाव अगर मतदारांची नावे विधानसभा मतदार यादीचा विचार करताना ज्या मतदार गटामध्ये व मतदार गणामध्ये नाव/नावे समाविष्ट करणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे दुसऱ्याच मतदार गट/गणामध्ये नाव/नावे समाविष्ट झाली असल्याचे निदर्शनास आल्यास कायद्यातील वर नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे मतदार यादी अधिप्रमाणित करण्यासाठी सक्षम असलेल्या अधिकाऱ्यांनी अशा नावाची यादी करून त्याखाली तारखेसह सही करून ती यादी संबंधित मतदार गट/मतदार गणाची मतदार यादी सोबत जोडावी.

३. विधानसभा मतदार यादीत नाव आहे परंतु, मतदार गटनिहाय व मतदार गणनिहाय तयार केलेल्या गटाचे किंवा गणाचे मतदार यादीमध्ये समाविष्ट नसल्याचे निदर्शनास आल्यास कायद्यातील व वर नमूद केलेल्या तरतूदीप्रमाणे मतदार यादी अधिप्रमाणित करण्यास सक्षम केलेल्या अधिकाऱ्यांनी अशा नावाची यादी करून त्याखाली तारखेसह सही करून ती यादी संबंधित मतदार यादी सोबत जोडावी.

४. वरीलप्रमाणे तयार केलेल्या यादीतील मतदारांस/मतदारांना संबंधित मतदार गटाच्या/मतदार गणाच्या निवडणूकीसाठी मतदान करण्याची परवानगी देण्यात यावी. त्यासंबंधात आवश्यक त्या सूचना निर्वाचन अधिकारी व मतदान केंद्राध्यक्ष यांना देण्यात याव्यात. तसेच अनुक्रमांक-२ प्रमाणे तयार केलेल्या मतदार यादीची प्रत त्या मतदार गट/मतदार गणाच्या मतदार यादीमध्ये चुकीचे नाव/नावे समाविष्ट झाली असतील त्या मतदार गटाच्या/मतदार गणाच्या मतदान केंद्राध्यक्षाकडे देऊन बोगस मतदान होणार नाही, अशी दक्षता घेण्याबाबत त्यांना सूचना द्याव्यात.

५. तसेच प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी पत्रकार परिषद घेऊन किंवा प्रसिद्धी पत्रक देऊन ज्या मतदारांची नावे लगतच्या भागामध्ये व नगरपरिषद क्षेत्रातसुद्धा मतदार म्हणून नोंदविली आहेत किंवा मतदार गट व मतदार गणामधील क्षेत्रात एकापेक्षा जास्त ठिकाणी नोंदविली गेली आहेत तो तोतयेगिरी करणारा इसम बोगस मतदान करण्यासाठी मतदान केंद्रावर आल्यास त्याच्याविरुद्ध आवश्यक ती कायदेशीर कारवाई/फौजदारी खटला दाखल करण्यासहीत कारवाई तातडीने केली जाईल, अशा प्रकारे वर्तमानपत्रातून प्रसिद्धी द्यावी.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,
आपली

**(अपर्णा जोशी)**
**अवर सचिव**
राज्य निवडणूक आयोग.

३५—१०